MHST050003262025

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | १६/०४/२०२५ |
| नोंदणी तारीख | : | १७/०४/२०२५ |
| निकाल तारीख | : | १८/०७/२०२६ |
| कालावधी | : | वर्षे म. दि. |
| | | ०१ ०३ ०२ |

**<u>सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, कराड यांचे न्यायालयात</u>**

(पिठासन अधिकारी श्री पां. लिं. घुले)

**<u>नियमित दिवाणी दावा क्र. २५३/२०२५</u>** **<u>निशाणी क्र. ११</u>**

१) श्री संभाजी भागोजी मोटे,
वय : ६७ वर्षे, धंदा : शेती,

२) श्री. संतोष शिवाजी मोटे,
वय : ४२ वर्षे, धंदा : शेती,

३) श्री. शंकर शिवाजी मोटे,
वय : ३५ वर्षे, धंदा : शेती,
सर्व रा. वसंतगड, ता. कराड, जि. सातारा, ... **<u>वादी</u>**

**।। विरुध्द ।।**

१) उपअधिक्षक, भूमी अभिलेख, कराड,
ता. कराड, जि. सातारा.

२) महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी, सातारा,
तालुका व जिल्हा – सातारा ... **<u>प्रतिवादी</u>**

**<u>दावा</u>** :– हुकूमी ताकीद मिळण्याकरीता.

---

| | | |
|---|---|---|
| वादींतर्फे विद्वान वकील | : | श्री एन. व्ही. राजेभोसले. |
| प्रतिवादींकरीता | : | एकतर्फा |

---

## न्या य नि र्ण य

(घोषीत दिनांक – १८/०७/२०२६)

१) दावा मिळकतीची फेर मोजणी करुन दावा मिळकतीचे ०–४५ आर क्षेत्र वादींच्या कब्जात देण्याबाबत प्रतिवादींविरुद्ध हुकूमी ताकीद मिळण्याकरीता वादींनी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे.

**वादींची केस संक्षिप्त स्वरुपात खालीलप्रमाणेः–**

२) वादपत्राच्या परिच्छेद क्र. १ मध्ये विशेषरित्या वर्णन केलेली मौजे वसंतगड, ता. कराड, जि. सातारा येथील भुमापन क्र. २७१, क्षेत्र ० हेक्टर ४५ आर ही मिळकत प्रस्तुत दाव्यातील वादाचा विषय आहे. सदर मिळकतीला या खाली सोयीच्या दृष्टीने ''दावा मिळकत'' असे संबोधण्यात येते.

३) वादींच्या कथनानुसार वादपत्राच्या परिच्छेद क्र. १ मध्ये नमूद केलेली मिळकत वादींच्या मालकी वहिवाटीची आहे. दावा मिळकतीचे ७/१२ ला नोंदविलेले क्षेत्र ४५ आर इतके आहे. परंतु प्रत्यक्ष जागेवर ते क्षेत्र भरत नाही म्हणून वादींनी प्रतिवादी क्र. १ उपअधिक्षक, भुमी अभिलेख, कराड यांच्याकडे दावा मिळकतीची मोजणी करण्यासाठी व क्षेत्राची हद्द कायम करण्यासाठी अर्ज केला होता. सदर अर्जाप्रमाणे प्रतिवादी क्र. १ यांनी अतितातडी हद्द कायम मो. र. नं. १२८५ नुसार दिनांक १८/०७/२०२३ रोजी दावा मिळकतीची मोजणी केली. सदर मोजणीनुसार प्रतिवादी क्र. १ यांनी दि. २७/१२/२०२३ रोजी चुकीच्या हद्दी कायम केल्या आहेत. त्यामुळे सदर मोजणीप्रमाणे दावा मिळकतीच्या ७/१२ च्या रेकॉर्डनुसारचे ४५ आर क्षेत्र वादींच्या कब्जात भरत नाही.

४) वादींच्या कथनानुसार गट क्र. २७१ ची फेर मोजणी करुन ४५ आर क्षेत्र वादींच्या कब्जात देण्याची जबाबदारी प्रतिवादींची आहे. दावा मिळकतीची फेर मोजणी करुन व हद्दीच्या खुणा निश्चित करुन ४५ आर क्षेत्र वादींच्या कब्जात देण्यासाठी वादींनी प्रतिवादी क्र. १ उपअधिक्षक, भुमी अभिलेख, कराड व प्रतिवादी क्र. २ महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी, सातारा यांना दिनांक ०६/१२/२०२४ रोजी रजिस्टर पोस्टाने नोटीसा पाठविल्या. सदरच्या नोटीसा प्रतिवादींना दिनांक ०९/१२/२०२४ रोजी मिळाल्या. परंतु प्रतिवादींनी दावा मिळकतीची फेर मोजणी करुन व हद्दीच्या खुणा निश्चित करुन ४५ आर क्षेत्राचा कब्जा वादींना दिला नाही. त्यामुळे वादींना हा दावा दाखल करणे भाग पडले आहे. वादींनी प्रस्तुत दाव्यामध्ये अशी विनंती केली आहे की, दावा मिळकतीची फेर मोजणी करुन ४५ आर क्षेत्र वादींच्या कब्जात देण्याबाबत प्रतिवादींविरुद्ध हुकूमी ताकीद देण्यात यावी.

५) निशाणी क्र. ६ व ७ खालील बेलीफ रिपोर्टनुसार प्रतिवादी क्र. १ उपअधिक्षक, भुमी अभिलेख, कराड व प्रतिवादी क्र. २ महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी, सातारा यांच्यावर प्रस्तुत दाव्याच्या समन्सची बजावणी झाली आहे. समन्सची बजावणी होऊनही ते या कामी हजर न झाल्याने प्रस्तुतचा दावा प्रतिवादी क्र. १ व २ यांच्याविरुद्ध एकतर्फा चालविण्याबाबत निशाणी क्र.१ वर दिनांक ०९/१०/२०२५ रोजी आदेश पारीत केला आहे.

६) प्रस्तुत प्रकरणी वादींतर्फे विद्वान वकील श्री. एन. व्ही. राजेभोसले यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले.

७) वादींच्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर व अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले असता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले. त्यांचे निष्कर्ष मी खालील कारणमिमांसेसह नोंदविलेले आहेत.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादी हे त्यांनी विनंती केल्याप्रमाणे दावा मिळकतीच्या फेर मोजणीबाबत व ४५ आर क्षेत्राच्या कब्जाबाबत प्रतिवादींविरुद्ध हुकूमी ताकीदीचा दिलासा मिळण्यास पात्र आहेत का? | नाही. |
| २) | आदेश व हुकूमनामा काय ? | अंतीम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

८) वादींनी त्यांच्या वादपत्रातील कथनांच्या पुष्ट्यर्थ वादी क्र. २ श्री संतोष शिवाजी मोटे यांना निशाणी क्र. ८ कडे सरतपासणीचे शपथपत्र दाखल करुन तपासले आहे. तसेच वादींनी साक्षीदार क्र. २ म्हणून सदाशिव भागोजी कोकरे यांना निशाणी क्र. ९ कडे सरतपासाचे शपथपत्र दाखल करुन तपासले आहे. या व्यतिरिक्त वादी हे निशाणी क्र. ६ कडील मौजे वसंतगड, ता. कराड येथील गट क्र. २७१ चा ७/१२ चा उतारा यावर विसंबून राहिले आहेत. वादींनी त्यांचा पुरावा बंद करत असल्याबाबत निशाणी क्र. १० कडे पुरसिस दाखल केली आहे.

९) वर नमूद केल्याप्रमाणे निशाणी क्र. १ वर दिनांक ०९/१०/२०२५ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार प्रस्तुतचा दावा प्रतिवादी क्र. १ व २ यांच्याविरुद्ध एकतर्फा चालविण्यात आला आहे.

### मुद्दा क्र. १ च्या संदर्भातः–

१०) निशाणी क्र. ६ कडील मौजे वसंतगड, ता. कराड येथील गट क्र.२७१ च्या ७/१२ च्या उताऱ्याचे अवलोकन करता असे दिसून येते की, सदर गटाचे

एकूण क्षेत्र ४५ आर इतके आहे. सदर ७/१२ च्या उताऱ्यामध्ये भोगवटदाराचे नाव या रकान्यात वादी क्र. १ संभाजी भागोजी मोटे यांचे नाव २२.५० आर क्षेत्राकरीता नमूद आहे व वादी क्र. २ श्री संतोष शिवाजी मोटे व वादी क्र. ३ श्री शंकर शिवाजी मोटे यांचे नाव २२.५० आर क्षेत्राकरीता नमूद आहे.

११) वादींच्या वादपत्रातील व वादी क्र. २ च्या सरतपासणीच्या शपथपत्रातील कथनानुसार दावा मिळकत म्हणजेच मौजे वसंतगड, ता. कराड, जि. सातारा येथील भुमापन क्र. २७१, क्षेत्र ० हेक्टर ४५ आर ही मिळकत वादींच्या वहिवाटीची आहे. दावा मिळकतीचे ७/१२ ला नोंदविलेले क्षेत्र ०–४५ आर इतके आहे. परंतु प्रत्यक्ष जागेवर ते क्षेत्र भरत नाही. त्यामुळे वादींनी प्रतिवादी क्र. १ उपअधिक्षक, भुमी अभिलेख, कराड यांच्याकडे दावा मिळकतीची मोजणी करण्यासाठी व क्षेत्राची हद्द कायम करण्यासाठी अर्ज केला होता. सदर अर्जाप्रमाणे प्रतिवादी क्र. १ यांनी अतितातडी हद्द कायम मो. र. नं. १२८५ नुसार दिनांक १८/०७/२०२३ रोजी दावा मिळकतीची मोजणी केली. सदर मोजणीनुसार प्रतिवादी क्र. १ यांनी दिनांक २७/१२/२०२३ रोजी चुकीच्या हद्दी कायम केल्या आहेत. त्यामुळे सदर मोजणीप्रमाणे दावा मिळकतीच्या ७/१२ च्या रेकॉर्डनुसारचे ४५ आर क्षेत्र वादींच्या कब्जात भरत नाही.

१२) वादींच्या वादपत्रातील व वादी क्र. २ च्या सरतपासणीच्या शपथपत्रातील कथनांवरुन असे दिसून येते की, वादींनी दावा मिळकतीची म्हणजेच गट क्र. २७१ ची मोजणी करण्यासाठी प्रतिवादी क्र. १ उपअधिक्षक, भुमी अभिलेख, कराड यांच्याकडे अर्ज देण्यापुर्वी सदर गटातील संपूर्ण ४५ आर क्षेत्र वादींच्या ताब्यात नव्हते. परंतु दावा मिळकतीची मोजणी करण्यासाठी उपअधिक्षक, भुमी अभिलेख, कराड यांच्याकडे अर्ज देण्यापुर्वी गट क्र. २७१ मधील नेमके किती क्षेत्र वादींच्या ताब्यात होते याबाबत वादींनी वादपत्रामध्ये

स्पष्टपणे कथन केलेले नाही.

१३) वादींच्या वादपत्रातील व वादी क्र. २ च्या सरतपासणीच्या शपथपत्रातील कथनानुसार मो. र. नं. १२८५ नुसार दिनांक १८/०७/२०२३ रोजी गट क्र. २७१ ची मोजणी केली त्यावेळीही सदर गटातील संपूर्ण ४५ आर क्षेत्र वादींच्या ताब्यात नव्हते. परंतु मो. र. नं. १२८५ नुसार दिनांक १८/०७/२०२३ रोजी गट क्र. २७१ ची मोजणी केली तेंव्हा वादींच्या ताब्यात नेमके किती क्षेत्र आढळून आले व वादींच्या ताब्यात नेमके किती क्षेत्र कमी आढळले याबाबत वादींनी त्यांच्या वादपत्रामध्ये व वादी क्र. २ च्या सरतपासणीच्या शपथपत्रामध्ये स्पष्टपणे कथन केलेले नाही.

१४) वादींच्या वादपत्रातील व वादी क्र. २ च्या सरतपासणीच्या शपथपत्रातील कथनानुसार प्रतिवादी क्र. १ यांनी अतितातडी हद्द कायम मो. र. नं. १२८५ नुसार दिनांक १८/०७/२०२३ रोजी दावा मिळकतीची मोजणी केली. सदर मोजणीनुसार प्रतिवादी क्र. १ यांनी दिनांक २७/१२/२०२३ रोजी चुकीच्या हद्दी कायम केल्या आहेत. या अनुषंगाने वादपत्राच्या परिच्छेद क्र. १ मधील दावा मिळकतीच्या वर्णनाचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादींनी दावा मिळकतीच्या वर्णनामध्ये गट क्र. २७१, क्षेत्र ० हेक्टर ४५ आर या मिळकतीच्या चतु:सिमा नमूद केलेल्या नाहीत. मो. र. नं. १२८५ नुसार प्रतिवादी क्र. १ यांनी दिनांक २७/१२/२०२३ रोजी गट क्र. २७१ च्या निश्चित केलेल्या हद्दी चुकीच्या असल्याबाबतच्या कथनाच्या पुष्ट्यर्थ वादींनी कोणताही ठोस पुरावा अभिलेखावर आणलेला नाही.

१५) वर नमुद केल्याप्रमाणे मो. र. नं. १२८५ नुसार दिनांक १८/०७/२०२३ रोजी गट क्र. २७१ ची मोजणी केली तेंव्हा वादींच्या

ताब्यात नेमके किती क्षेत्र आढळून आले व वादींच्या ताब्यात नेमके किती क्षेत्र कमी आढळले याबाबत वादींनी त्यांच्या वादपत्रामध्ये व वादी क्र. २ च्या सरतपासणीच्या शपथपत्रामध्ये स्पष्टपणे कथन केलेले नाही. तसेच प्रतिवादींनी अथवा इतर कोणी वादींच्या मालकीच्या दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण केले आहे अशीही वादींची केस नाही.

१६) मो. र. नं. १२८५ नुसार दिनांक १८/०७/२०२३ रोजी गट क्र. २७१ ची मोजणी केली तेंव्हा वादींच्या ताब्यात नेमके किती क्षेत्र आढळून आले व वादींच्या ताब्यात नेमके किती क्षेत्र कमी आढळले याबाबत वादींनी त्यांच्या वादपत्रामध्ये व वादी क्र. २ च्या सरतपासणीच्या शपथपत्रामध्ये स्पष्टपणे कथन केलेले नाही ही बाब विचारात घेता व तसेच प्रतिवादींनी अथवा इतर कोणी वादींच्या मालकीच्या दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण केले आहे अशीही वादींची केस नाही ही बाब विचारात घेता व तसेच वादींनी दावा मिळकतीच्या वर्णनामध्ये गट क्र. २७१, क्षेत्र ० हेक्टर ४५ आर या मिळकतीच्या चतु:सिमा नमूद केलेल्या नाहीत ही बाब विचारात घेता व तसेच मो. र. नं. १२८५ नुसार प्रतिवादी क्र. १ यांनी दिनांक २७/१२/२०२३ रोजी गट क्र. २७१ च्या निश्चित केलेल्या हद्दी चुकीच्या असल्याबाबतच्या कथनाच्या पुष्ट्यर्थ वादींनी कोणताही ठोस पुरावा अभिलेखावर आणलेला नाही ही बाब विचारात घेता माझ्या मते गट क्र. २७१ या मिळकतीची फेर मोजणी करुन ४५ आर क्षेत्र वादींच्या ताब्यात देण्याबाबत प्रतिवादी क्र. १ व २ यांना आदेशित करण्याचा प्रश्न उपस्थीत होत नाही. त्यामुळे वरील नमूद सर्व कारणांचा विचार करता माझ्या मते वादी हे त्यांनी विनंती केल्याप्रमाणे दावा मिळकतीच्या फेर मोजणीबाबत व ४५ आर क्षेत्राच्या कब्जाबाबत प्रतिवादींविरुद्ध हुकूमी ताकीदीचा दिलासा मिळण्यास पात्र नाहीत. म्हणून मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. २ च्या संदर्भातः</u>–**

१७) मुद्दा क्र. १ च्या संदर्भात वर केलेली सर्व चर्चा व कारणमिमांसेनुसार हे न्यायालय या निष्कर्षास आले आहे की, वादी हे त्यांनी विनंती केल्याप्रमाणे दावा मिळकतीच्या फेर मोजणीबाबत व ४५ आर क्षेत्राच्या कब्जाबाबत प्रतिवादींविरुद्ध हुकूमी ताकीदीचा दिलासा मिळण्यास पात्र नाहीत. त्यामुळे वरील नमूद कारणांमुळे माझ्या मते वादींचा दावा कायद्याने समर्थनीय नाही व तो फेटाळण्यास पात्र आहे. सबब, हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## <u>आदेश</u>

१) प्रस्तुतचा दावा खर्चासह फेटाळण्यात येतो.

२) येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

३) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करून घोषित करण्यात आला.

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2026.07.18 12:16:08 +0530

दिनांकः– १८/०७/२०२६ (पां. लिं. घुले)
ठिकाणः– कराड सह दि. न्या. व. स्तर, कराड